# स्पष्ट औद्योगिक धोरण, समर्थ नेतृत्व



वाय. एम. देवस्थळी

सीएमडी, एल अँड टी फायनान्स होल्डिंग्ज




महाराष्ट्राचे ठोकळ उत्पन्न (जीएसडीपी) १६,५३,३८१ कोटी रुपये असून देशाच्या उत्पन्नात हा वाटा १४.४ टक्के आहे. औद्योगिक उत्पादनात राज्याची हिस्सेदारी १७ टक्के आहे. देशाच्या एकूण महसुलापैकी सुमारे ४० महाराष्ट्रातून मिळतो. तरीही, गुजरात, तामिळनाडू या छोट्या राज्यांच्या विकासाचा दर महाराष्ट्रापेक्षा जास्त आहे.

राज्याच्या शेती क्षेत्रातील विकासाचा दर ८ टक्क्यांवर घसरला आहे. पावसाने दगा दिला हे खरे असले तरी, सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यात झालेल्या दिरंगाईमुळे त्याचा खर्चही अव्वाच्या सव्वा वाढला आहे. मराठवाडा, विदर्भ दुष्काळाच्या तोंडावर उभे राहिले आहेत. शिवाय, सहकार क्षेत्रातील सुधारणांचा अभावही शेतीविकासाला मारक ठरत आहे.

देशाच्या औद्योगिक विकासात राज्याचा वाटा २९ टक्क्यांवर अडला आहे. वीजपुरवठ्याचा खेळखंडोबा, पाणीटंचाई आणि औद्योगिक क्षेत्रातील साचलेपण यामुळे महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीला खीळ बसली आहे. राज्यातील औद्योगिक गुंतवणुकीपैकी ८५ टक्के गुंतवणूक मुंबई, ठाणे, रायगड, पुणे आणि नागपूर याच जिल्ह्यांत होते. वास्तविक, ही गुंतवणूक ३५ जिल्ह्यांत विस्तारली गेली पाहिजे. औद्योगिक विकासातील हे असंतुलन तातडीने कमी करण्याची गरज आहे.

कामगार कायद्यात न झालेल्या सुधारणा आणि झपाट्याने वाढत असलेली मजुरी यामुळे अनेक उद्योग इतर राज्यांत स्थलांतरित होऊ लागले आहेत. जागेचे प्रचंड भाव, मालमत्तांची उपलब्धतेची समस्या, भूसंपादनातील अडचण, प्रक्रियेतील दिरंगाई आणि गुंतागुंतीच्या कायदेशीर चौकटीमुळे एखादा उद्योग सुरू वा बंद करणे अवघड. चढे कर आणि शुल्क हेही त्यात भर घालत आहेत. विशेषत: लघु व मध्यम उद्योगांना करावा लागणारा अतिरिक्त खर्च परवडत नाही!

अपुऱ्या पायाभूत सुविधा आणि सहजपणे उद्योग करता येईल अशा पोषक वातावरणाचा अभाव राज्यात जाणवतो आहे. गुंतवणूकदार अजूनही महाराष्ट्रालाच प्राधान्य देत असले तरी, ही स्थिती कायम रहावी असे वाटत असेल तर वरील दोन्ही घटकांचा अभाव दूर करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतील.

मुंबईला मेगा सिटी आणि 'फायनान्शिअल हब' बनवण्यासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांचा विकास करावा लागणार आहे. पण, त्यासाठी कटिबद्ध आणि समर्थ नेतृत्व लागेल. तसेच, विविध सरकारी विभागांमध्ये समन्वय साधावा लागेल.

प्रकल्प मंजुरीसाठी सिंगल विंडो सिस्टिम, सुस्पष्ट आणि पारदर्शक सरकारी धोरणे आणि कररचना यांची वेळच्या वेळी अंमलबजावणी करणे जरूरीचे आहे. राज्याच्या सातत्यपूर्ण विकासासाठी हे मुद्दे कळीचे ठरतात!

- मुंबई मेगासिटी, 'फायनान्शिअल हब' बनवणे.
- पायाभूत सुविधा, पोषक वातावरण निर्माण करणे.
- गुंतवणुकीची व्याप्ती सर्व जिल्ह्यांमध्ये होणे गरजेचे.
- पारदर्शक धोरणे व कररचना लागू करणे.
- सिंचनाचा विस्तार करून शेती विकास साधणे.